लोकमत

# राजकीय नेत्यांनी जागविला संवेदनशील मनांचा जागर

## मान्यवरांच्या उपस्थितीत 'बिनचेहऱ्याची माणसं' या पुस्तकाचे प्रकाशन



**मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात 'बिनचेहऱ्याची माणसं' या पुस्तकासह त्याच्या ऑडिओ आणि ई-बुकचे प्रकाशन झाले. त्या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री दीपक सावंत, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, लोकमत एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन विजय दर्डा, लोकमतचे एडिटर इन चिफ राजेंद्र दर्डा, बुकगंगा डॉट कॉमचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश बाळ जोशी, सुलेखनकार अच्युत पालव आदी मान्यवर उपस्थित होते.**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई** : राजकारण आणि पत्रकारितेसारख्या क्षेत्रात रोज अनेक लोक भेटतात. अनेक प्रसंग अनुभवायला येतात. त्याला सरावलेले मन आपसूकच कोडगे बनायला लागते. परंतु समाजात मोठ्या प्रमाणावर असलेले दु:ख समजून घ्यायचे असेल, त्याचे निराकरण करायचे असेल तर प्रयत्नपूर्वक मनाची संवेदनशीलता जपायला हवी, अशी भावना राजकारणातील दिग्गजांनी व्यक्त केली. त्याला निमित्त होते 'लोकमत'चे वरिष्ठ सहायक संपादक अतुल कुलकर्णी लिखित 'बिनचेहऱ्याची माणसं' या पुस्तकाच्या प्रकाशनाचे.

नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सभागृहात पुस्तकासह ऑडिओ आणि ई-बुकचे प्रकाशन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आरोग्यमंत्री दीपक सावंत, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, लोकमतच्या एडिटोरियल बोर्डाचे चेअरमन विजय दर्डा, लोकमतचे एडिटर इन चिफ राजेंद्र दर्डा, बुकगंगा डॉट कॉमचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार जोगळेकर, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश जोशी, सुलेखनकार अच्युत पालव आदी उपस्थित होते.

'बिनचेहऱ्याची माणसं' पुस्तकातून समाजाच्या संवेदना प्रकट होतात. पुस्तकातील शब्द, घटना, चित्रे आणि अक्षरेही बोलतात, असे हे अनोखे पुस्तक आहे. लेखन, चित्रकला आणि सुलेखन कला यांचा सुरेख संगम त्यात आहे. शिवाय ई-आवृत्ती आणि ऑडिओ बुकचेही प्रकाशन झाले आहे. हा मराठी साहित्यातील एक वेगळा प्रयोग असल्याचे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले. सामान्यांची स्पंदने आणि संवेदना पुस्तकात प्रतिबिंबित झाल्या आहेत. फार कमी शब्दांत मोठा आशय, संवेदना आणि भावना पुस्तकातून व्यक्त झाल्या आहेत. पुस्तकातील प्रत्येक कथेवर एक स्वतंत्र पुस्तक लिहिता येईल इतके महत्त्वाचे विषय पत्रकार अतुल कुलकर्णी यांनी पुस्तकातून मांडल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

संवेदनशीलतेची प्रत्येक क्षेत्रात आवश्यकता आहे. संवेदनशीलता बोथट होते तेव्हा माणसाचे माणूसपण हरवत जाते. प्रत्येक चांगल्या माणसाच्या ठायी एक संवेदनशील मन असणे ही व्यक्तीची सर्वांत मोठी शक्ती असते. परिस्थिती चांगल्या माणसालाही अडचणीत टाकते. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या खचलेली माणसे आपले सत्त्व हरवतात आणि त्यांच्या हातून काही चुका घडतात. सुदैवाने महाराष्ट्राच्या राजकारणात, समाजकारणात आणि पत्रकारितेत अजूनही संवेदनशीलता टिकून आहे. अतुल कुलकर्णी यांच्या पुस्तकातून त्याचीच प्रचिती येते, असे गौरवोद्गार गडकरी यांनी काढले.

पत्रकारांनी कादंबरी लिहिण्याची मोठी परंपरा महाराष्ट्रात आहे. अशा कादंबऱ्यांवर सिनेमेही आले. मात्र, या लिखाणाचे स्वरूप प्रामुख्याने राजकीय होते. अतुल कुलकर्णी यांनी मात्र सामान्य माणसाला केंद्रबिंदू बनविले. त्याच्या संवेदना टिपल्या, त्याची मालिका बनविली, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

तर, पत्रकार आणि पत्रकारिता मुक्त असेल तर समाज स्वस्थ आणि स्वतंत्र राहील, असे लोकमतचे चेअरमन विजय दर्डा यांनी सांगितले. अशा स्वातंत्र्यातूनच संवेदनशील मनाची घडण होते. अतुल कुलकर्णींच्या पुस्तकातील संवेदनशील कथा समाजात बदलाच्या प्रक्रियेला गती देतील, असा विश्वास विजय दर्डा यांनी व्यक्त केला.

'बिनचेहऱ्याची माणसं' या पुस्तकातून कथा, चित्र आणि सुलेखनाचा प्रभावी संगम पाहायला मिळतो. अशा त्रिवेणी संगमातून दर्जेदार साहित्यनिर्मितीचा हा महाराष्ट्रातीलच नव्हे, तर देशातील पहिला प्रयोग असल्याचे गौरवोद्गार राजेंद्र दर्डा यांनी काढले. समाजाचे प्रश्न, समाजातील वेदना मांडण्याची संवेदनशीलता 'लोकमत'ने जपली आहे. लोकमत समूहाचे हेच संस्कार लेखक अतुल कुलकर्णी यांच्यावर झाले आहेत. त्यामुळेच समाजातील सामान्य माणसाच्या संवेदना त्यांच्या लेखणीने टिपल्याचे राजेंद्र दर्डा म्हणाले. अतुल कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार आणि चित्रकार प्रकाश बाळ जोशी, सुलेखनकार अच्युत पालव आणि मंदार जोगळेकर यांचीही भाषणे झाली.